लंपी आजाराच्या संकटाने दूध उत्पादक धास्तावला

मोहनीराज लहाडे, लोकसत्ता

नगर : नगर जिल्हा राज्यात दूध उत्पादनात अग्रेसर आहे. जिल्ह्याचे दैनंदिन दूध संकलन आता ४१ लाख लिटरवर जाऊन पोहोचले आहे. दुधाला बाजारात बरा दर मिळू लागताच दुसरीकडे दुभत्या जनावरांच्या लंपी आजाराने जिल्ह्यातील शेतकरी धास्तावला आहे. लंपी आजाराच्या जिल्हाभर प्रादुर्भाव पसरल्याचे आढळले आहे. नगर जिल्ह्यावरोबरच पुणे, जळगाव, अमरावती, नागपूर, धुळे या जिल्ह्यांतही प्रादुर्भाव आढळला आहे.

केंद्र व राज्य सरकारने या आजारावरील नियंत्रणासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. तरीही प्रादुर्भाव वाढत चाल्ल्याने त्याबाबत गंभीर्याने अंमलबजावणी होण्याच्या आवश्यकता निर्माण झाली आहे. जिल्ह्यात दुभत्या गाई-म्हशींची संख्या १५ लाख ९९ हजार ६५८ आहे. त्यामध्ये म्हशींची संख्या २ लाख २१ हजारांवर आहे. पशुसंवर्धन विभागाच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात जनावरांची संख्या मोठी असलेले ५ लाख ३३ हजारांवर गोठे आहेत. अर्थात ही संख्या सन २०१९ मधील पशुगणनेची आहे. या संख्येत आता वाढ झाली आहे. परिणामी दूध व्यवसायावरील अवलंबित्वाची संख्याही वाढलली आहे.

या संसर्गजन्य आजाराच्या नियंत्रणासाठी जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांची सध्या मोठी धावपळ उडाली आहे. बैठकांचे सत्र, तपासणी मोहिमा सुरू करण्यात आल्या आहेत. लसीकरणानेही वेग घेतला आहे. २ लाख २१ हजारांवर लसमात्रा उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. बाधित क्षेत्राच्या ५ किमी परिघात धूरीकरण, १० किमी परिसरात जनावरांची वाहतूक, जनावरांचा आठवडे बाजार प्रदर्शन शर्यती यांना मनाई करण्यात आली आहे. खाजगी पशुवैद्यकांचीही मदत घेतली जात आहे. यांची जिल्ह्यातील संख्या तीन हजारांवर आहे.

उपायोजना करूनही बाधित क्षेत्र, गोठे यांची संख्या रोज वाढू लागली आहे. त्यामुळे पशुसंवर्धन विभाग, जिल्हा प्रशासनाची यंत्रणा यांनी कठोर पावले उचलणे गरजेचे झाले आहे. राज्यात काल, मंगळवारपर्यंत मृत्युमुखी पडलेल्या जनावरांची संख्या २४ होती.

लंपी आजार संसर्गाची लक्षणे

दुभत्या जनावरांना ताप येणे, वारणाची सेपवाने प्रमाण कमी होणे, राखी जनावरांमध्ये वारणा सूज येऊन लवकरात, गाठ्याला सूज येणे, संसर्ग गाठ्यात तीव्रतून, शेतकऱ्यांतून राग वाढणे, गाभण जनावरांचे गर्भपात होणे. संसर्ग अधिक वाढ्यात अमावर नाही येणे, त्यांच्या संसर्गात, आजारात वाढ होणे, त्या पुढचे, जखमा होणे, तसेच पायांवर, बोटेवर, वारणेलिंगा आणि आजार बळावणे. जखमांवर बसणाऱ्या माशांमुळे पुन्हा संसर्ग पसरवणे. केवळ डास माशा व्हीडीए वापुळे हा संसर्ग पसरत नाही तर माध्यमाद्वा माध्यमांमुळे गोठ्यामध्ये शिरवाव करतो.

सरकारने लागू केलेल्या नियमांची अधिक काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. शेतकरीही जनावरांचे आजार लपवत आहेत त्यामुळे जनजागृती जास्त प्रमाणात होणे आवश्यक आहे पुढील महिन्यात साखर कारखान्यांचे गाळप हंगाम सुरू होतील. त्यामुळे मोठ्या संख्येने जनावरे कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील त्यापुर्वीच संसर्ग आटोक्यात आणणे आवश्यक आहे. राज्य सरकार व जिल्हा परिषदेचा पशुसंवर्धन विभाग खाजगी पशुवैद्यक दूध संघ यांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. -राजेश परजणे, अध्यक्ष गोदावरी सहकारी दूध संघ.

नगर जिल्ह्यात ४० ठिकाणी संसर्ग झाल्याचे आढळले आहे. त्यामुळे फॉगिंग, लसीकरण, गोठा स्वच्छता, तेथे हवा खेळती ठेवणे, मोबाइल व्हॅनच्या माध्यमातून माहिती देणे, फलक लावणे, पत्रके वाटप करणे या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. खाजगी पशुवैद्यक संघटनेची प्रतिबंधक उपायांसाठी मदत घेतली जात आहे. आवश्यकतेनुसार जनावरांची वाहतूक बंद ठेवणे, बाधित क्षेत्रात बाजार, प्रदर्शन बंद ठेवणे अशा उपायोजना केल्या जात आहेत. -डॉ. सुनील तुंबारे, उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग.

आता धरणापासून दोनशे मीटरपर्यंत प्रतिबंधित क्षेत्र

विकास कामे करण्यास मनाई

लोकसत्ता खास प्रतिनिधी

अमरावती : राज्यात धरणांच्या परिसरात पर्यटन आणि इतर विकास कामांमुळे निर्माण झालेली सांडपाण्याची समस्या लक्षात घेता धरणाच्या वरच्या बाजूस पूर फुगवटाचापासून (एफएफएल) २०० मीटरपर्यंत कोणत्याही प्रकारची विकास कामे करण्यास प्रतिबंध घालण्यात आले आहेत.

जलसंपदा विभागाच्या परिपत्रकानुसार पर्यटन किंवा इतर विकास कामांसाठी मोठ्या व मध्यम प्रकल्पांच्या वरच्या बाजूस पूर फुगवट्यापासून २०० मीटर अंतर हे प्रतिबंधित क्षेत्र राहणार असून लघु प्रकल्पांसाठी हे अंतर ७५ मीटर इतके ठेवण्यात आले आहे. जलाशयाच्या वरच्या भागात नागरी वसाहतींसाठी मोठ्या व मध्यम प्रकल्पांच्या बाबतीत ३०० मीटर तर लघु प्रकल्पांच्या बाबतीत २०० मीटर अंतर हे प्रतिबंधित क्षेत्र राहणार आहे. या प्रतिबंधित क्षेत्राचा हरित पट्टा (ग्रीन बेल्ट) म्हणून वापर करता येणार असला, तरी कोणतीही विकास कामे करता येणार नाहीत.

धरणाच्या बांधकामापासून ठराविक उंचीचे क्षेत्र हे निषिद्ध क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आले असून या क्षेत्रामध्ये जमीन पातळीपासून

सांडपाणी प्रक्रिया न करता थेट धरणांमध्ये

राज्यातील बहुतांश मोठ्या आणि मध्यम प्रकल्पांमधून जवळपासच्या शहरांतील आणि ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. पण, मध्यंतरीच्या काळात झालेल्या विकास कामांमुळे धरणाच्या आसपासच्या परिसरातील सांडपाणी प्रक्रिया न करता धरणांमध्ये सोडण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही समस्या गंभीर होणार असल्याने आता जलसंपदा विभागाने प्रतिबंधित क्षेत्राच्या अंतरामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.

एक मीटरपेक्षा जास्त खोदकाम करता येणार नाही. ५ ते १० मीटर धरण किंवा घटक कामांच्या उंचीसाठी निषिद्ध अंतर ५० मीटर ठेवण्यात आले आहे. १० ते ३० मीटर उंचीसाठी हे निषिद्ध अंतर उंचीच्या दहा पट किंवा १५० मीटर यापैकी जे जास्त असेल ते राहणार आहे.

धरण किंवा घटक कामाची त्या ठिकाणची उंची ३० मीटरपेक्षा जास्त असेल, तर ३५० मीटर किंवा उंचीच्या दहा पट यापैकी जास्त असेल ते अंतर निषिद्ध ठेवण्यात आले आहे. धरणावरील प्रतिबंधित अंतर या धरणरेषेवर संबंधित ठिकाणच्या उंचीनुरूप राहणार आहे. परवानगी द्यावयाचे अंतर हे लघुप्रकल्पाच्या बाबतीत २०० मीटर असून, धरणरेषेवर संबंधित ठिकाणच्या भरावाच्या बांधकामाच्या उंचीवर अवलंबून राहणार असल्याचे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. जलाशयातील किंवा नदीतील पाणी प्रदूषित होणार नाही, तसेच सांडपाणी जलाशयात मिसळणार नाही, याची विकासकांना खबरदारी घ्यावी लागणार आहे. धरणाच्या वरील बाजूस आणि पायथ्यालगतच्या क्षेत्रामध्ये महत्त्वाच पाणी पातळीपासून पर्यटन विषयक कामांसाठी ५०० मीटर तर उद्योगांसाठी ५०० मीटर असा निकष होता. हे अंतर जास्तीचे असल्याने पर्यटन आणि इतर विकास कामांना चालना मिळावी, यासाठी अंतरात सुधारणा करण्याची मागणी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी केल्याने २०१८ मध्ये त्यात काही सुधारणा देखील करण्यात आल्या होत्या.

लोकसत्ता वार्ताहर

कास पठारावर आता विद्युत बस धावणार

प्रदूषण रोखण्यासाठी अन्य वाहनांवर निर्बंध

१० पासून सशुल्क प्रवेश

वाई: वाढत्या प्रदूषणामुळे कास पठारावरील फुलांचा धोका टाळण्यासाठी या पठारावर येणाऱ्यासाठी विद्युत ऊर्जेवरील बस लवकरच सुरू केली जाणार आहे. याबाबतचे आदेश वनविभाग व कास संवर्धन समितीस दिले असल्याचे जिल्हाधिकारी रूपेश जयवंशी यांनी सांगितले. यापूढे पठारावर अन्य इंधनावरील सर्वच वाहनांवर निर्बंध आणले जाणार आहेत. परिसरातील गावांमधील रहिवाशांची वाहने ये-जा करण्यासाठी देखील बाध्यवळण रस्त्याची योजना करण्यात येणार आहे.

कास पठाराचा जागतिक वारसा स्थळ यादीमध्ये समावेश आहे. या निवडीपासून पर्यटकांचा ओढा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या भागात पर्यटक आणि त्यांची वाहने यांचे प्रमाण वाढल्यामुळे प्रदूषण होत आहे. यावर कायम स्वरूपी उपाय योजना करण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी रूपेश जयवंशी, पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, उपप्रादेशिक अधिकारी अनिल चव्हाण, त्याचवरोबर पी.एम.पी.एल. पुणे व बनविभाग, सातारा, पर्यटनमंत्रालय महाराष्ट्र राज्यच्या विविध अधिकाऱ्यांनी संयुक्तरीत्या कास, बामणोली, वजराई धबधबा या स्थळांची पाहणी केली.

कास पठारावर येणाऱ्या फुलांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे, याची जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेत ह्या निर्णय घेण्यात आला. या योजनेनुसार येथे आलेल्या पर्यटकांची वाहने सातारा कास रस्त्यावर असलेल्या गणेश खिंड परिसरातील पठारावील तळावर लावावीत. यापुढे हे पर्यटक विद्युत ऊर्जेवरील बसमधून पठारावर जातील. या निर्णयामुळे प्रदूषण पठारावर अन्य इंधनावरील वाहने जाणार नाहीत.

स्थानिक वाहनांनाही बंदी

दरम्यान, पर्यटकांसारखरच या भागात राहणाऱ्या नागरिकांनाही त्यांची वाहने अन्य मार्गे न्यावी लागणार आहेत. वासाठी घाटई मार्ग बामणोली परिसराकडे जाणारा रस्ता खुला केला जाणार आहे. या भागातील रहिवाशांची वाहने, एसटी सारखी वाहने या वळण मार्गे वळवली जाणार आहेत.

हत्ती स्थलांतरणाबाबत न्यायालयाकडून स्वत:हून याचिका

केंद्रीय पर्यावरण मंत्रालय, राज्य सरकारला नोटीस

लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी

नागपूर : गडचिरोली जिल्ह्यातील कमलापूर येथील हत्ती कॅम्पमधील हत्ती गुजरातच्या प्राणिसंग्रहालयात स्थलांतरित करण्याबरून नागपूर उच्च न्यायालयाने स्वत:हून याचिका दाखल करून घेतली आहे. जंगलातील हत्तींना प्राणिसंग्रहालयात स्थलांतरित करण्याबाबत वनखात्याने घाईगर्दीने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करून घेतलेल्या याचिकेत म्हटले आहे. याबाबत केंद्रीय व राज्य वनखात्याला उत्तर सादर करण्याची नोटीस न्यायालयाने दिली आहे.

गडचिरोलीच्या जंगलात इतर जंगलातून हत्ती येतात यावरून हा परिसर हत्तीसाठी जंगलात अधिवास असल्याचे स्पष्ट होते. याकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. मात्र, राज्य सरकारची भूमिका याविरोधात असून सरकार पर्यावरणाच्या विरोधात पावले उचलत आहे. जंगली हत्तींनी या जंगलाची निवड केली आहे. तो त्यांचा नैसर्गिक अधिवास आहे आणि अनेक वर्षांपासून ते येथे राहात आहेत. त्यामुळे कमलापूर ग्रामपंचायतीने योग्य ठराव केल्याशिवाय हत्तींना येथून बाहेर काढता येणार नाही. विशेष म्हणजे, येथून हत्ती हलवण्याच्या विरोधात कमलापूर ग्रामपंचायतीने ठराव केला आहे. भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत वनप्राण्यांच्या हक्काच्या विरोधात पावले उचलून हे स्थलांतरण करण्यात येत आहे. प्राणी माणसांप्रमाणे बोलू शकत नाहीत हे खरे असले तरी त्यांना एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात बळजबरीने नेता येत नाही. मानवाच्या हक्कांचा जेवढा आदर केला जातो, तेवढाच प्राण्यांच्या हक्काचा आदर केला जावा, तरच मानव-वन्यजीव संघर्षामुळे उद्भवणाऱ्या अनेक समस्यांचे निवारण होईल. प्राचीन हिंदू ग्रंथांनी प्राणी, पक्षी आणि प्रत्येक सजीव प्राण्यांचे हक्क आधोरेखाले आहेत. जंगली हत्तींमुळे गडचिरोली जिल्ह्यातील जैवविविधतेत भर पडते. त्यामुळे जैवविविधता संरक्षण कायद्यानुसार येथील हत्तींची संख्या टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. त्यांना प्राणिसंग्रहालयात स्थलांतरित करणे हे या कायद्याच्या विरोधात आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊनच न्यायालयाने स्वत:हून याचिका दाखल करून घेतली आहे.

याप्रकरणी त्यांनी केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, राज्याचे मुख्य सचिव, महसूल व वनखात्याचे प्रधान सचिव, आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव, समाजकल्याण विभागाचे प्रधान सचिव, राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष व केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या अध्यक्षांना प्रतिवादी केले असून त्यांना उत्तर सादर करण्याबाबत नोटीस दिली आहे.

शिवसेनेतील फुटीप्रकरणी २७ सप्टेंबरला सुनावणी

(पान १ वरून) की, उद्धव गटाचा हे निश्चित करावे लागणार आहे. मूळ शिवसेना आपलीच असल्याने धनुष्य-बाण या निवडणूक चिन्हावर आपलाच अधिकार असल्याचा दावा शिंदे गटाने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केला आहे. मात्र, निवृत्त सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी २३ ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीमध्ये निवडणूक आयोगाने तोंड निर्णय घेऊ नयेत, असे तोंडी आदेश दिले होते. त्यासंदर्भात शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयात अर्ज करून निवडणूक आयोगाची सुनावणी सुरू ठेवण्याची विनंती केली होती. या मुद्द्यावर बुधवारी न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या पाच सदस्यीय घटनापीठापुढे सुनावणी झाली.

न्या. चंद्रचूड यांनीही बुधवारी झालेल्या सुनावणीमध्ये निवडणूक आयोगाला कोणताही आदेश दिले नाहीत आणि यासंदर्भात २७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या सुनावणीमध्ये निर्णय दिला जाईल, असे स्पष्ट केले. शिंदे गटाच्या वतीने वकील नीरज कौल यांनी, निवडणूक आयोगाची सुनावणी आणि न्यायालयातील प्रलंबित प्रकरणाचा एकमेकांशी थेट संबंध नसल्याचा युक्तिवाद केला. केंद्रीय निवडणूक आयोगाला निवडणूक चिन्हांसंदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार असल्याचे सांगितले. त्यावर, यापूर्वी तीन सदस्यांच्या पीठाने यासंदर्भात लेखी आदेश दिला आहे का, अशी विचारणा न्या. चंद्रचूड यांनी केली.

शिंदे गटाने मंगळवारी केलेल्या अर्जानंतर तातडीने हालचाली होऊन लगेचच न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. एम. आर. शाह, न्या. कृष्ण मुरारी, न्या. हिमा कोहली आणि न्या. पी. एस. नरसिंह या [illegible] घटनापीठ [illegible] आले.

स्टेट बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज् (एम्. एस्. पटेल) को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई.
स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य शाखा बिल्डिंग, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.

नोटीस

सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, स्टेट बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज् (एम्. एस्. पटेल) को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबईची ९३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. १४ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी ०३.३० वा. एस्.एस्.डी.टी. पुरुषोत्तम दामोदर ठाकरसी सभागृह आणि क्रेडी हांतांबाई पारकर कॉन्फ्रेन्सेस हॉल, १, नायगांवी क्रॉसरोड रोड, व्हीनस् रोड, वर्सोवा, मुंबई ४०० ०३०, येथे आयोजित करण्यात आली असून सर्व सभासदांना उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे. वार्षिक अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद सर्व सभासदांच्या शाखा / कार्यालयात पाठविण्यात आले आहेत. नोटीस सोसायटीच्या संकेत स्थळावर www.sbimspatel.com व सोसायटीच्या नोंदणीकृत कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे. सभेस येताना बँकेचे ओळखपत्र आणणे बंधनकारक आहे. तरीच चोंदिर - १९ अंतर्गत सर्व सूचनांचे पालन करावे.

संचालक मंडळाच्या हुकुमावरून,
मुकेश भाटिया
भा.नु. - सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी

मुंबई
दि. २१.०८.२०२२

OMKARA ASSETS RECONSTRUCTION PVT. LTD.

ओमकारा ॲसेट्स् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय : सी/515, कनकिया झिलीथल, एलबीएस रोड आणि मीरामरी रोड चे जंक्शन, बीकेसी अनेक्स, इक्विनॉक्सजवळ, कुर्ला (पश्चिम), मुंबई 400070.
मोबा.: 022-26544000

[परिशिष्ट - IV-ए] [नियम 8(6) ची तरतूद पाहावी] अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, 2002 मधील नियम 8(6) व 9(1) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे कर्जदार मे. हॉटेल सिल्वर प्राईड आणि जामीनदार श्री अंशुमन दिलीप जाधव आणि श्री विजय दत्तात्रय जाधव यांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनको (बँक ऑफ बडोदा) कडे तारण/गहाणत असलेल्या खालील वर्णनाच्या मालमत्तेचा बँक ऑफ बडोदा च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून वर नमूद कर्जदार व जामीनदारांकडून ओमकारा ॲसेट्स् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांना 31 ऑगस्ट, 2022 पुरता येणे असलेल्या रु. 3,63,61,135/- (रुपये तीन कोटी त्रेसष्ट हजार एकसष्ट हजार एकशे पस्तीस फक्त) अधिक दि. 31 ऑगस्ट, 2022 पासुनचे व्याज व खर्च एकत्र रक्कमेच्या वसुलीसाठी दि. 28 ऑक्टोबर,2022 रोजी स. 11.00 वाजता "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे ते काही आहे" आणि "येथे जे काही आहे" तत्त्वावर आणि कुठलाही उपाय नाही तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

ओमकारा ॲसेट्स् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (ओमकारा पीएस 29/2021-22 ट्रस्ट चे ट्रस्टी म्हणून काम पाहणारे) यांनी दि. 29 मार्च, 2021 रोजीच्या अधिहस्तांकन करारानुसे अधिहस्तांकनकर्ता बँक ऑफ बडोदा यांचेकडून खाली नमूद कर्जदारांकडून घेणे असलेली संपूर्ण रक्कमेची कर्जे त्यांच्यातील अंतर्निहित अनामतीसह अधिग्रहित केली आहेत.

अचल मालमत्तांचे वर्णन, आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम तसेच ज्ञात बोजे (असल्यास) खालीलप्रमाणे आहेत:

मालमत्तेचे वर्णन	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम	ताब्याची स्थिती
1. क्षेत्रफळ 0 हे 84 आर मधील सुमारे 0 हे 5.60 आर, आणि प्लॉट खसरा क्षेत्रफळ 0 हे 13 आर, गट क्र. 2873 ए/1, कसेलगव, तालुका वळवा, जिल्हा सांगली, आणि चतुःसीमा: उत्तरेस: शकिलका पाटील यांची मालमत्ता, दक्षिणेस: अंशुमन दिलीप जाधव यांची मालमत्ता, पूर्वेस: रस्ता, पश्चिमेस: रस्ता	रु. 3,68,00,000/- (रुपये तीन कोटी अडुसष्ट लक्ष फक्त)	रु. 36,80,000/- (रुपये छत्तीस लक्ष ऐंशी हजार फक्त)	प्रत्यक्ष ताबा
2. क्षेत्रफळ 0 हे 84 आर मधील सुमारे 0 हे 32.70 आर, आणि प्लॉट खसरा क्षेत्रफळ 0 हे 13 आर, गट क्र. 2873 ए/1, कसेलगव, तालुका वळवा, जिल्हा सांगली, आणि चतुःसीमा: उत्तरेस: अंशुमन दिलीप जाधव यांची मालमत्ता, दक्षिणेस: श्री. सुतार यांची मालमत्ता, पूर्वेस: रस्ता, पश्चिमेस: रस्ता			

ई-लिलाव दिनांक	सप्टेंबर 28, 2022, बुधवार स. 11.00 ते दु. 12.00 वाजेपर्यंत
पाहणी दिनांक	सप्टेंबर 20, 2022, मंगळवार स. 12.00 ते दु. 4.00 वाजेपर्यंत
किमान बोली वृद्धी रक्कम	रु. 5,00,000/- (रुपये पाच लक्ष फक्त)
सहभागी होण्याचे बोली पत्र जमा करण्याची केवायसी दस्तावेज / बयाणा रक्कमेचा पुरावा सादर करण्याची शेवटची दिनांक आणि वेळ :	सप्टेंबर 27, 2022, 4.00 वाजेपर्यंत

स्थावर मिलकतीच्या ई-लिलाव विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया https://omkaraarc.com/auction.php / किंवा https://www.bankauctions.com/ येथे दिलेली लिंक पाहावी. जर इच्छुक बोलीदारांनी बयाणा रक्कमेचा पुरावा सादर केलेला आहे आणि लॉगिन आयडी व पासवर्ड सबर करणे डेटा अपलोड करणे, बोली सादर करणे, ई-बोली प्रक्रियेबाबत प्रशिक्षण इ. बाबत मदत हवी असल्यास त्यांनी ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी१ इंडिया प्रा.लि., टेली. हेल्पलाईन: +91-7291981124/25/26, हेल्पलाईन ई-मेल आयडी: support@bankauctions.com, किंवा श्री harish गौडा, मोबाईल: 9594597555 ई-मेल hareesh.gowda@c1india.com यांचेशी आणि मालमत्तेशी संबंधित चौकशीसाठी प्राधिकृत अधिकारी श्री पियुष जैन, मोबाईल: +91 8879093790 ई-मेल: piyush.jain@omkaraarc.com यांचेशी संपर्क साधावा.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणाऱ्या नियम 8(6) अंतर्गत विक्रीसाठी वैधानिक सूचना

हे सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणाऱ्या नियम 8(6) अंतर्गत आणि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या तरतुदींतर्गत वर नमूद कर्जा खात्याच्या कर्जदार / जामीनदारांसाठी वर नमूद दिनांकाला जाहीर लिलावाद्वारे विक्री सर्वसाधारण वेळेत असल्यावरावर 15 (पंधरा) दिवसांची अनिवार्य मुदतदेखील आहे आणि त्यांची इच्छा असल्यास ते खर्च व शुल्कांसह वर नमूद केल्याप्रमाणे थकबाकी रक्कमेचा फरक करून अनामत मत्ता सोडवून घेऊ शकतात. भरणा न केल्यास, मालमत्तेची सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट), 2002 मधील नियम 8(5) अंतर्गत विहित केल्याप्रमाणे कोणत्याही पद्धतीने विक्री करण्याचा प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको यांना अधिकार असेल.

दिनांक: 07/09/2022
स्थान: मुंबई

स्वा/-प्राधिकृत अधिकारी,
ओमकारा ॲसेट्स् रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
(ओमकारा पीएस 29/2021-22 ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून काम पाहणारे)

Hinduja Housing Finance Limited

कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना

कॉर्पोरेट कार्यालय: प. २७अ, केशवराव इंडस्ट्रियल इस्टेट, वुडली, वेर्ली-९.०० ०३२, ताम्रिसाबू

शाखा कार्यालय: १२२०/ए, बुधवार भवन, पहिला मजला, आय्ये रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००५, महाराष्ट्र.

दुग्धी आणी मनूद कुमार्थी अनुसूचीत नमूद केलेली मालमत्ता गहाण ठेवून कर्ज सुविधेचा लाभ घेतला होते आणि दुग्धी खाती मनूद केलेले कर्ज करारानामाकरित खालील सह-ऋणको/ सर्वदाता मनूद अद्याप, परिणामी दुग्धी कोलेरल कायुगिवडे तुमच्या कर्ज खात्याचे विविध मर्यादी सुरक्षितता आणि पुर्तेचना आणि सुरक्षा हित कायदा, २००२ (सिक्युरायट "सर्फेसी कायदा") च्या तरतुदीअंतर्गत "जॉइन-परफॉर्मेंस ॲसेट" म्हणून जप्तीकरण करण्यात आले आहे. आम्ही हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेडने तुम्ही दिलेल्या पत्त्यावर सर्वेसी कायद्याच्या कलम १३(१२) याखाल याचलेल्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केली आहे. रजिस्टर्ड पोस्ट/ व्हर्ट कुरिअरद्वारा तुमच्या पत्त्यावितल्या सूचना पोचल्याने सेवा पत्र आम्ब आहेत व सूचना स्वीकारला आहेत. उक्त सूचनेमधील समाविष्ट केलेल्या अशा आहे की, दुग्धी तुमच्याद्वारा हमी दिलेल्या विविध करांचे प्रदान करण्यात कसूर दाखविली आहे. त्यामुळे, सर्वेसी कायद्याच्या कलम १३(२)च्या तरतुदीनुसार सूचना देण्याकरीता आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ३(१)च्या तरतुदीच्या अनुसार सदर प्रसिद्धी देण्यात आली आहे :

कर्ज. ऋणको व हमीदाराचे नाव व पत्ता	स्थान	अंमलबजावणी करावयाच्या सुरक्षेचा तपशील	एनपीए तारीख	मागणी सूचना तारीख	मागणी सूचनेनुसार देय रक्कम
श्री. रतीलाल जगन्नाथ (ऋणको) व श्रीमती प्रतिभा जगन्नाथ (सह-ऋणको)	एमएच/ पीएनई/ पीएनई/ ००००००/ ००२३१	पुढील जंगम मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे: जमीन क्षेत्रावरील बांधकामासह, घरात कितेला इतरांकडील मालकत्ता धरिता मोजमापाचा २७अ, अमलेला सर्वे नं. १२९/१, हिस्सा नं. १३९, येथे स्थित- चौक- पुरुषोत्तम, तहसील रुपेनी, जि. पुणे आणि मालमत्ता पुढीलप्रमाणे चिन्हित आहे: पूर्व: रोड, पश्चिम: सर्वे नं. १२५, उत्तर: श्री. निवाजमे यांची मालमत्ता, दक्षिण: श्री. मोरे यांची मालमत्ता.	२७ ऑगस्ट २०२२	१८ ऑगस्ट २०२२	रु. २७,९५,९३०/- (रुपये सत्तावीस लाख पाऱ्यांशी हजार नऊशे तीस फक्त)

तुम्हाला याद्वारा स्थान व चिन्हत पुढील नमूद केलेली रक्कमेचे या सुचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आतमध्येच्या आत हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेडला प्रदान करण्यात फर्मावितला आले आहे, त्याशा असमर्थ ठरल्यास त्याकरीत हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ऋणको, जामनदार व हमीदारांच्या सुरक्षित मत्तेच्या तारा मनूद सायमिक सर्व किंवा कोणतीही एक किंवा अधिकतम सुरक्षित मत्तेच्या अनुसार उक्त कायदाच्या तरतुदीअंतर्गत आवश्यक कारवाई करील. उक्त कायद्याअंतर्गत हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेडला पुढील सर्वाधिक अधिकार उपलब्ध आहे (१) सुरक्षित मत्ता ताब्यात घेणे किंवा अधिकारांकडून हस्तांतरणाबाबत हक्क समाविष्ट ऋणको/ हमीदारांच्या सुरक्षित मत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार (२) हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड द्वारा सुरक्षित मत्तेकडून कोणतीही कब्जाचा अधिकार आणि सुरक्षित मत्ता विकून वसुली करण्याचा आणि भाडेपट्टा, हस्तांतरण किंवा विक्रीद्वारा हस्तांतरणाकरिता हक्क समाविष्ट सुरक्षित मत्तेचे व्यवस्थापन इतरी घेण्याचा व इतरांना सुरक्षित मत्तेसंबंधात कर्ज देण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार. उक्त कायद्याच्या कलम १३(१३)च्या तरतुदीच्या अनुसार, गुंतवारा पद्धतीने हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या पुर्व-सम्मतीशिवाय हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडे तारणगहाण असलेल्या महाराष्ट्र असलेल्या आणि या संदर्भात कोणतीही सुरक्षित मत्तेची विक्रि, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने (गुंतवणा व्यवहारावरा व्यवस्थापन हितसंबंधांना) हस्तांतरणाकरिता प्रतिबंधित करण्यात आले आहे.

स्थळ : पुणे
तारीख : ०८/०९/२०२२

स्वा/- प्राधिकृत अधिकारी
हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

IDBI BANK
आयडीबीआय बँक लिमिटेड
CIN : L65190MH2004GOI148838
प्रादेशिक कार्यालय, पहिला मजला, १७२/ई, पुष्कळपुरी बिल्डिंग, रविवार पेठ, विजयी सर्कल, पर्वती नाका, सातारा, महाराष्ट्र - ४१५००१.

ताबा सूचना

आयडीबीआय बँक, लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याने सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सिअल ॲसेट्स व एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२, अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ सोबत वाचले असता, कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना खालीलप्रमाणे मागणी करण्याची सुचना कलम १३(२) च्या अंतर्गत खालील प्रत्येक कर्जदाराना देण्यात आली व त्यादरे सदर सुचना मिळाल्यापासून तारखेपासून ६० दिवसात नमू